ISSN 2278-8808 SJIF 2015: 5.403
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# शिक्षण कला, संगीत व नाटयाची भूमिका

**डॉ.जाधव रमाकांत श्रीहरी** *(Page 265-269)*
*शिक्षण शास्त्र महाविद्यालय, अ.नगर*

**SRJIS IMPACT FACTOR SJIF 2015**: 5.401
**Date of Issue Release:** 04/03/2017,
**Volume**: SRJIS, Jan-Feb, 2017, 4/30

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना:**

व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाठी केलेली धडपड म्हणजेच शिक्षण होय. जे शिक्षण व्यक्ती, समाज व देशाच्या नैतिक विकासाचे कारण बनते, ज्या शिक्षणामुळे माणसाचे व्यक्मिमत्व संतुलित होते व सभ्य, सुसंस्कृत, सुयोग्य व सहृदय होते अशा या शिक्षणाच्या काही व्याख्या पाहू..

1. ''शिक्षण म्हणजे मानवातील पूर्णत्वाचा आविष्कार'' — स्वामी विवेकानंद
2. प्रत्येक माणसात काही विशिष्ट प्रमाणात जन्मजात निसर्गदत्त शक्ती असतात.
   त्या जागृत करुन पूर्णत्वास नेणे म्हणजेच शिक्षण होय. — प्लेटो
3. माणसाच्या शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक अंगाचा विकास म्हणजे शिक्षण होय — म. गांधी

वरील व्याख्यांचा अर्थ लक्षात घेता माणसाचे मन, मनगट व मेंदूचा विकास करणे म्हणजेच शिक्षण होय. —म.गांधी

शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकी किडे बनवणे नसून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे होय. आजची चिमुकली मुले, ज्यांच्या खांद्यावर भविष्यातील राष्टीची जबाबदारी आहे अशा मुलांचं व्यक्तिमत्व विकसित करण्यासाठी, त्यांची मने संस्कारक्षम करण्यासाठी शालेय शिक्षणात कला संगीत व नाटय विषयाची पुढील भूमिका सांगता येईल.

**१) कलांचा प्रचार व प्रसार** : आपल्या राष्ट्राने विश्वाला बहाल केलेल्या अनेक देणग्यांपैकी भारतीय वास्तूकला, शिल्पकला, नाटक व शास्त्रीय संगीत ही एक महान देणगी आहे. शिक्षणाचा मुख्य उद्देश आपल्या कला व सांस्कृतिक वारसा जपूण ठेवणे हा आहे. म्हणूनच आपल्या संगीत कलेला देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवायचे असेल तर आजच्या शिक्षणप्रणालीमध्ये हे विषय अंतर्भूत करुन आपल्या सांस्कृतिक वारशांचा प्रचार व प्रसार करता येणे शक्य आहे.

**२) सुप्त गुणांचा विकास:** प्रत्येक व्यक्तिंमध्ये काही ना काही सुप्त गुण असतात. परंतु त्याला त्याची जाणीव नसते. ज्याप्रमाणे एखाद्या विस्तवाकडे वेळीच लक्ष दिले नाही तर त्याची राख होते. परंतू त्याच वेळी विस्तवावर हळुवार फुंकर मारली असता तो विस्तवतेज धारण करतो. त्याचप्रमाणे मुलांच्या शाळेतच कलांशी परिचय झाल्यास त्यांच्यातील सुप्त गुणांचा विकास होईल.

**३) संस्कार रुजविण्यास मदत:** विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यातील स्नेहाचे नाते आज संपुष्टात येत आहे. आजही विद्यार्थ्यांमध्ये शालीनता, नम्रता, विनयशीलता, शिस्त असे संस्कार रुजविण्याचे

सामर्थ्य विविध कलांमध्ये आहे. म्हणूनच जर शिक्षणात कला व संगीत भुमिका गुणग्राहक शक्ती प्रबळ असलेल्या विद्यार्थ्यांना संस्कारक्षम बनवणे ही आहे. आदर्श राष्ट्र निर्माण व्हायला वेळ लागणार नाही.

**४) कल्पना शक्तीचा विकास:** शास्त्रीय गायन ही एक अशी कला आहे की, जिच्यात केवळ सातच स्वर आहेत. एखाद्या रागात पाच ते सात स्वर असतात. परंतू त्या पाच ते सात स्वरांचा विकास कल्पना शक्तीच्या जोरावर इतका विस्तृत होतो की, चार ओळींची एक बंदिश अर्धा ते एक तास रंगते. म्हणून संगीत भागेतून विद्यार्थ्यांची कल्पनाशक्ती, निरीक्षणशक्ती वाढू शकते. यातूनच देशाला आवश्यक असलेले कल्पक शास्त्रज्ञ, कल्पक तंत्रज्ञ, कल्पक नेतृत्व, कल्पक सहित्यिक, विचारवंत निर्माण होतील.

**५) कलावंताची निर्मिती:** कोणत्याही राष्ट्राची उंची ही तेथील विचारवंत, संशोधक, नेतृत्व व कलावंतांवर अवलंबून असते. आज बहुतांशी पालकांचा ओढा हा आपल्या मुलाला, डॉक्टर किंवा इंजिनियर बनविण्याकडे आहे. परंतु आपल्या राष्ट्राला कलाकार व संगीत तज्ज्ञांचीसुध्दा तेवढीच गरज आहे. म्हणून ज्या विद्यार्थ्यांना कलेची नैसर्गिक देणगी मिळालेली असते त्यांना उत्तम कलावंत बनविण्यास प्रवृत्त केल्यास राष्ट्राला आवश्यक असणारे कलावंत निर्माण होतील. आधुनिक युगात कलावंतांना मिळणारा मानसन्मान, प्रतिष्ठा व मानधन डोळे दिसणारे आहे.

**६) शिक्षण पध्दती सोपी होईल:** आजच्या शिक्षणप्रणालीबद्दल 'विद्यार्थ्यांच्या वजनापेक्षा दप्तर जड' असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. अशा या क्लिष्ट शिक्षणप्रणालीमुळे विद्यार्थी अभ्यासाकडे दुर्लक्ष करतात. परंतु शिक्षण पध्दती कलावधारित केली तर विद्यार्थ्यांना आनंदातून शिक्षण मिळेल. यात काही कविता, सुत्रे, प्रमेय, ऐतिहासिक घटना. इ. बाबींना कलांचा साज चढविला तर त्या बाबी विद्यार्थ्यांच्या चिरकाल स्मरणात राहतील. या संदर्भात अमेरिकेतील 'इंटरनॅशनल सोसायटी फॉर म्युझिक एज्युकेशन' या संस्थेने प्रयोग करुन हे सिध्द केले आहे.

**७) पाहण्याचा उचित दृष्टिकोन:** एका वेगळया भावविश्वात घेऊन जाणारे सप्त विकसित होईल व अन्य कला शैक्षणिक अभ्यासक्रमात अंतर्भूत केल्यास विद्यार्थ्यांची स्मरणशक्ती, एकाग्रता, गुणग्राहकता, रसिकता, सौंदर्य टिपण्याची शक्ती वाढू शकते.

**८) सर्वांगीण विकासात हातभार:** चित्रकला, मातीकला, कागदकाम अशा कला शिकत असतांना कारक कौशल्यांचा विकास होतो. विविध आकार, कृती रंग, साहित्य, प्रतिमा याविषयी चर्चा करतांना भाषिक विकास होते. कला शिक्षणातून समस्या निराकरण व चिकित्सक विचारांना बळकटी मिळते. विविध कलांमधील साहित्य, वैशिष्ट यांची निवड करतांना, अनुभव घेत असतांना नवनवीन कल्पना विकसित होण्यास मदत होते. मुलांना अन्वयार्थ लावणे, चिकित्सा करणे, दृक माहितीचा वापर करणे, त्यावर आधारित मत बनवणे. यासाठी कलांचे शिक्षण उपयुक्त ठरते. त्यातून नवनवीन मते संशोधने निर्माण होवू शकतात. कला व संस्कृतीचे जवळचे नाते आहे. कलाशिक्षणातून सांस्कृतिक जाणीव वाढीस लागते. विविध अभ्यासातून असे सिध्द झाले आहे की कला आणि शैक्षणिक संपादणूकीत सहसंबंध आहे. कला शिक्षणातून स्वनियमन ;मसि त्महनसंजपवदद्ध निर्माण होते. त्यात अवधान केंद्रीकरण, प्रत्याभरणाचा योग्य वापर, अभ्यासक्रम संदर्भातील समस्यांचे निराकरण ;जंपदह तपौद्ध सहकार्य भावना व ध्येयनिश्चिती यांचा समावेश होतो.

**९) आत्मप्रकटीकरण:** विविध कलांव्दारे आत्मप्रकटीकरणामुळे शालेय जीवनातच विद्यार्थ्यांच्या मनाला, शरीराला सुंदर वळण लागून भावी जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन अधिक कलात्मक, सौंदर्यपूर्ण बनेल. कलेमुळे आस्वाद घेण्याच्या वृत्तीचा विकास होईल. त्यामुळे जीवन समुध्द, सुखी आनंदी बनविण्याकडे चाललेली धडपड कलेमुळे सहजतेने होईल. मन मनाचा व्यापार, कृती, मनाचे प्रकटीकरण चांगल्या तऱ्हेने होऊन जीवनातील खरा आनंद लुटता येईल. शालेय जीवनापासून सौंदर्यभिरुचीचा विकास करणे हे कलेचे मुख्य कार्य आहे. नुसते भाषा, गणित, शास्त्र या विषयांचे अध्ययनातून दैनंदिन व्यवहार, योग्य अयोग्य वर्तवणूक नितिमत्ता या विषयाच्या संकल्पना परिपक्व होतात. जिज्ञासाने समाधान होऊ लागते. पण हा जो जीवनातील व्यापार आहे. व्यवहार आहे हा अधिक आनंदीमय, कलात्मक व सौंदर्यपुर्ण व्हावा यासाठी कला विषयासारखा दुसरा विषय नाही. कला विषयामुळे शालेय जीवनापासूनच जीवनाकडे पहाण्याचा दृष्टीकोन बदलेल.

**१०) भावनांचे पोषण:** कलेत सौंदर्य, ताल, लय, मेळ व प्रमाणबध्दता असते. नैतिक परिपर्णता, सार्वजनिक मांगल्य, सामाजिक व सांस्कृतिक मूल्यांची जोपासना यासाठी 'कला' विषय पोषक आहे. कलेतून आकार सौदर्य . विचार सौंदर्य त्र भावसौंदर्याची निर्मिती होते. चांगले भाव विद्यार्थ्यांमध्ये शालेय जीवनापासून निर्माण झाले, म्हणजे घर, समाज यांच्यातील आचारास, पोषक अशा सामाजिक मूल्यांची जोपासना व संस्कार बाल वयातच होते. सृष्टीतीत सौंदर्य पहाण्याची शक्ती म्हणजे रुची. या रुचीची वाढ कला विषयामुळे होते. कलेत आत्म्याचे प्रकटीकरण असे. उत्स्फूर्तता असते. सौंदर्यदृष्टी निर्माण होते. सौंदर्य हे अंतरात्म्यात असते. त्या आत्मम्याचे बाहय प्रकटीकरण म्हणजे समाजातील वावर कलात्मकतेने होतो. जीवनाची स्वच्छता, सुंदरता कला शिकविते. कलेतून भाविष्कार घडतात. कलेतून मेळ, ऐक्य निर्माण होते. भावना ऐक्य निर्माण करते. यातूनच राष्ट्रीय ऐक्याची भावना जोपसली जाते.

**११) शिस्त:** कला ही एक शिस्त आहे. कलेतून कृती घडत असते. ही कृती, त्यातील नियोजन, कल्पकता, कलात्मकता, सौंदर्य, कौशल्य या सर्वात मेळ घालत असता एक शिस्त लावून घेणे महत्वाचे असतं. अशी शिस्त कलेद्वारे अंगी बाणते.

**१२) रसग्रहणक्षमतेचे विकसन:** कलाकृती घडण्याइतकेच कलाकृतीचा आस्वादही घेता येणे आवश्यक आहे. चांगले चित्रपट पाहणे, नाटक, संगीत नाटक, कथाकथन ऐकणं, शास्त्रीय संगीत, नृत्य अशा मैफिलीला जाणे, चित्रपदर्शन पाहणे, उत्तम सहित्य वाचणे, या सर्वांवर चर्चा करणे, त्याचे विश्लेषण करणे, चित्र, संगीत, शिल्प, नृत्य, नाटय, साहित्य अशा इतर कलेच्या विविध अंगांची माहिती करुन घेणे. या सर्वातून कला—अस्वादक वृत्ती निर्माण होऊन त्या व्यक्तीचे भावजीवन संपन्न, समृध्द बनत असते. या सवंदेनाक्षम मनाची जोपासना, विकास कलेमुळे होत असतो. त्यातून इतरांबद्दल आपुलकी, आत्मीयता, सहानुभूती निर्माण होते. केवळ विज्ञान,शास्त्र, गणित आणि तंत्रज्ञानाला महत्व देऊन नव्या पिढीला आपल्याला यंत्रमानवासारखे निर्जीव बनवायचे नाही. विज्ञानालाही सौंदर्यदृष्टीची जोड देऊन एक सहद्य व्यक्मित्व निर्माण करणे हे आजच्या शिक्षणाचे ध्येंय आहे. त्यासाठी शालेय जीवनापासूनच कलेच्या विविध अंगांचा उपयोग करुन घेऊन असे व्यक्तिमत्व घडवतात येईल.

**१३) स्व—शोध :** कलेतून मनाला, शरीराला वळण लागत असते. वळण हे ठराविक वयातच अंगी बाणता येते. आणि असे लागलेले चांगले वळण हे आयुष्यभर आपली पाठ सोडत नाही.

कलात्मक निर्मिती करत असताना मूल रममाण होते. त्याला सगळयाचा विसर पडतो. अगदी स्वत:चाही या तल्लीनतेत त्याच्या मनाला व शरीराला नकळत वळण लागत असे. अनुभव मिळत असतो. त्या अनुभवातूनच, त्या कलात्मक आविष्कारातूनच तो स्वत:चे असे वेगळे अस्तित्व शोधत असतो आणि ते सापडल्यावर त्याला आंनद मिळतो. अशी सृजल आनंद घेण्याची सवय विद्यार्थीदशेत एकदा लागली की विध्वंसक वृत्तीचा विचार त्याच्या मनाला शिवणार सुध्दा नाही. कलेमुळे व्यक्तींमधील सुप्त गुणशक्ती विशिष्ट पध्दतीने पण सकारात्मक वाटेने व्यक्त होते.

**१४) कौशलय विकास:** विविध ललित कलांद्वारे स्नायू, मन यावर ताबा मिळविणे, त्यांना योग्य वळण लागणे, विविध साधनसामग्रीचा वापर करता येणे. त्यातून अनुभवात वाढ करणे, विविध माध्यमांद्वारे कौशल्याचा विकास घडवून आणणे, रचना संपत्ती, रंग आकाराचे ज्ञान होते.

स्वर्गीय सुखाची अनुभूती करुन देणारे, स्वत्वाला विसरुन अनंतात विलीन व्हायला लावणारे संगीत म्हणजेच भारतीय शास्त्रीय संगीत! मानवाच्या दैनंदिन जीवनात, सामाजिक जीवनात संगीताचे महत्व आहेच. परंतु याचबरोबर शिक्षणातसुध्दा संगीताचे महत्व आहे.

होवार्ड गार्डिनरची बहुविध बुध्दिमता उपपत्ती कलांशी संबंधित आहे. भाषिक, सांगितिक, दृक्, नैसर्गिक, अवकाशीय, शारारिक बुध्दिमत्ता.

Lois Hetland, Harvard University: Cultures are judged on the basis of their arts most cultures and historical eras have not doubted the timprotance of including the ats as part of every child's education. They are time honored ways of learning, Knowing and expressing.

शैक्षणिक नाटय मुलांसाठी असून प्राथमिक वर्गापासून तो माध्यमिक वर्गापर्यंत त्याचे स्वरुप हळूहळू बदलत जाते. साधरणपणे मुक्त खेळ (फ्री प्ले), मुक्त नाटय(फ्री थिएटर) आणि पूर्ण नाटय (टोटल थिएटर) अशा तीन अवस्थांतून ते वाटचाल करते. त्याकरिता ते अनुक्रमे पूर्ण, वर्तुळ, अर्धवर्तुळ आणि वर्तुळ मध्य अशा तीन स्थलाकारांचा स्वीकार करते.

शैक्षणिक नाटयाचे प्राथमिक स्वरुप पूर्णत: आत्मविषकारी असते. वर्तुळाकृती मोकळया जागेत मुले विविध प्रकारच्या भूमिका घेतात. त्यांना अनुरुप असे हावभाव करतात व भाषेणे बोलतात. जी जे काही करतात ते स्वत:साठी असते. कुणा अन्य पाहणाऱ्यांसाठी नसते. तसेच ते पूर्णत: उत्स्फुर्त असते. त्याचा विकास स्वप्रेरणेने व स्वतंत्रपणे होतो.

शिक्षक चेतना देतो. मदत करतो, तो शिकवितो म्हणजे शिकण्यास आवश्यक असे वातावरण आणि पर्यावरण निर्माण करतो. तो प्रथम मुलांच्या हालचालींना व नंतर हालचलींबरोबर शब्दांना मुक्त वाव मिळेल असे विविध पाठ, मूकनाटये आणि नाटयखेळ त्यांच्यापुढे ठेवतो.

मुक्त नाटयासाठी सामान्यत: अर्धवर्तुळाकृती जागी सोयीची ठरते. त्या जागेच्या एका बाजूला भिंत किंवा अन्य पार्श्वभूमी असू शकते. शब्दांचा विशेष उपयोग, खुर्च्या, ठोकळे यासाखरे ठरावीक सामान आणि गटागटाने नाटयविष्कार हे या अवस्थेतील नटयाचे विशेष येथे काही विद्यार्थ्यांना काही काळ पाहण्याचे कार्य करावे लागते तरी रुढाया ते प्रेक्षक नसतात, ते सहकारी असतात. भाग घेणारे असतात. तसेच त्यांच्यात आणि कामे करणाऱ्यात कोणत्याही प्रकारची विभाजन, रेषा नसते. शेवटी शेवटी लिखित शब्दांना जिवंत करणे. अन्य विषयांतून मिळणाऱ्या माहितीचा उपयोग करणे. कथेची किंवा प्रसंगाची रुपरेषा घेणे. कविता, संगीत, मुखवटे किंवा चित्रे

यांचा अधार घेणे. उत्स्फूर्तविष्कारावरुन नाटयसंहिता तयार करणे यासारख्या गोष्टींना चालना दिली जाते.

नाटयामुळे कित्येक गोष्टी शैक्षणिक माध्यम म्हणून साधतात. मुलांना सर्वच गोष्टीबद्दल कुतूहल असते. त्यांच्या जाणीवाही तीव्र असतात आणि मुख्य म्हणजे त्यांची कल्पनाशक्ती कमालीची तल्लख असते. त्यामुळे भोवतालच्या अनेक गोष्टीबद्दलच्या प्रतिक्रिया व्यक्त करण्यास नाटय उपयुक्त ठरते. या प्रकाराच्या आत्मविष्कारामुळे मुलांना नवे अनुभव मिळतात. अपरिचिताचा वेध घेता येतो आणि जीवनाचे शिक्षण मिळते.

भाषा आणि शरीर हालचाली ही अभिव्यक्तीची महत्वाची साधने असून त्या दोहांच्याही विकसाला नाटयाची मदत होते. नाटयातील संवादातून माणसांच्या स्वभावाचे आणि परस्परसंबंधाने दर्शन घडविणे जाते. त्यामुळे आवाज, त्याचे चढउतार, आघात, शब्दांची निवड, शब्दांची फेक, वाक्याची बांधणी, बोलण्याची गती, भावदर्शन इत्यादी भाषिक कौशल्यांचा सराव होतो. शरीर हालचाली ही सुध्दा भाषाच आहे. प्रत्येक हालचाल सहेतुक असते. त्यातून कोणता ना कोणता भाव व्यक्ता होतो.

## संदर्भ

*शैला भंगाळे — शिक्षणातील कला व नाटय*
*सतोश पाटील— शिक्षनशास्त्र अ.प.कला व संगीत*
*प्रा. पाटील— संगीत शिक्षण*